मराठी साहित्य परिषद
तेलंगण राज्य, हैदराबाद


# पंचधारा


वर्ष ६९ वे, अंक पहिला

एप्रिल २०२६ ते जून २०२६
चैत्र ते ज्येष्ठ शके १९४८


## गोवा मुक्तिसंग्राम आणि साहित्य विशेषांक

Peer/Referee reviewed by UGC




मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : रु. १७५/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## गोवा मुक्तिसंग्राम आणि साहित्य विशेषांक

**वर्ष ६९ वे, अंक पहिला**

**एप्रिल २०२६ ते जून २०२६**
**चैत्र ते ज्येष्ठ शके १९४८**

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे
डॉ. चिन्मय मधू घैसास (अतिथी संपादक)

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद — ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावेत.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

BHIM UPI
SCAN & PAY

पंचधारा वर्गणी Marathi Sahitya Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125
IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. १७५/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका

संपादकीय .................................................. ५

प्रस्तावना .................................. डॉ. चिन्मय मधू घैसास ........ ७

श्रद्धांजली : आसावरी काकडे ................ विद्या मक्तल .................... ९

- गोवा मुक्तिसंग्रामातील बंडांचे
  ऐतिहासिक विश्लेषण ..................... प्राप्ती महेंद्र गांवकर ............ ११
- गोवा मुक्ती आंदोलन
  (पुस्तकाच्या प्रस्तावनेतील काही अंश) ... कै. मधुकर महाजन ........... १८
- गोमंतक स्वातंत्र्यलढा :
  चिकित्सात्मक अवलोकन ................. डॉ. सीमा रिसबूड ............. २१
- नगरहवेलीचा चित्तथरारक मुक्तिसंग्राम..... डॉ. विद्या देवधर ............. २६
- स्वातंत्र्यसेनानी बाकीबाब.................. परेश वासुदेव प्रभू............. ३१
- गोवा मुक्तिसंग्रामातील वीरांगना :
  नेतृत्व आणि कर्तृत्व ........................ स्नेहा यशवंत देसाई........... ३९
- सतीचे वाण : एक ऐतिहासिक दस्तऐवज.. डॉ. विनायक ल. बापट....... ४७
- गोवा मुक्तिसंग्रामाच्या ..................... रसिका केदार जोशी........... ५५
  पार्श्वभूमीवरील आत्मचरित्रांचा.............. डॉ. चिन्मय मधू घैसास ...... ५५
  तुलनात्मक अभ्यास
- सुभाष भेण्डे यांच्या कादंबऱ्यांतील
  गोवा मुक्तिसंग्राम : एक अभ्यास .......... मानसी संजय शेट-मांद्रेकर ... ६०
- गोमंतकीय मराठी कथेतील
  गोवा मुक्तिसंग्रामाचे व तत्कालीन
  समाजवास्तवाचे चित्रण..................... डॉ. पूर्वा पंडित-वस्त ......... ६७
- १८ जून १९४६ आणि गोमंतकीय
  मराठी कादंबरी : एक अनुबंध ............ योगिता कालिदास चोडणकर . ७५

- पु. शि. नार्वेकर लिखित 'विघ्नहर्ता' कथासंग्रहातील पोर्तुगीजकालीन गोमंतकीय जीवन ........................ डॉ. भक्ती गोविंद महाजन .... ८
- गोमंतकीय क्रांतीचे दर्शन घडवणारे ........ डॉ. चिन्मय मधू घैसास ..... ९
  ऐतिहासिक नाटक 'शिवगोमंतक' .......... प्रा. ओंकार गोवेकर
- मुक्तिपूर्व गोमंतकातील महत्त्वपूर्ण सामाजिक दस्तऐवज : राजाराम पैंगीणकर यांचे आत्मचरित्र 'मी कोण?' ............ डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या... ९
- गोवा मुक्तिसंग्रामात.......................... प्रा. भास्कर सुखदेव ढोके .. १०
  मराठी साहित्यिकांचे योगदान :............ फणिंद्र रंगनाथ मंडलिक .... १०
  एक चिकित्सकीय अभ्यास


## ग्रंथपरीक्षणे


- सुबोध योगवासिष्ठ : संक्षिप्त मराठी अनुवाद ...................... आसावरी काकडे .......... ११
- कविता आणि मानवतावाद (Poetry and Humanism)............. प्रा. स्वाती हरिभाऊ काटे ... ११
- घुबड - भेट, निरीक्षण आणि संवर्धनाची गरज ........................... राजेश्वरी किशोर ............ १२


## कार्यवृत्त


- संघर्ष सूक्त ते वैभव गाथा : मराठी महाविद्यालय माजी विद्यार्थी संमेलन ..................... डॉ. कांचन जतकर.......... १२
- भावनेशी सूर जुळता ...................... अरुण डवलेकर ............ १३

स्वागत नव्या पुस्तकांचे ........................................................... १३
लेखक परिचय ........................................................................ १३

# सतीचे वाण : एक ऐतिहासिक दस्तऐवज



**डॉ. विनायक ल. बापट**

आत्मचरित्र हा एक व्यक्तिनिष्ठ वाङ्मयप्रकार आहे. तो एका व्यक्तीच्या जीवनाचा वा त्याच्या जीवनातील एका विवक्षित भागाला तत्कालीन काळ, घटना, प्रसंग, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन या सर्वांच्या विविध कंगोऱ्यांसह शब्दबद्ध करीत असतो. त्यामुळेच तो एका अर्थाने त्या व्यक्तीच्या विशिष्ट काळाचा इतिहासदेखील असतो. अर्थात हे लिहीत असताना लेखकाची भूमिका आणि उद्देश तेवढाच महत्त्वाचा असतो. आत्मचरित्र हे आत्मप्रौढी वा आत्मगौरव या भूमिकेतून लिहिल्यास तो एका विवक्षित काळाचा ऐतिहासिक दस्तऐवज होण्यापेक्षा ती ऐतिहासिक वस्तुनिष्ठतेची मोडतोड होण्याची शक्यताच जास्त असते. स्व. मोहन रानडे यांच्या 'सतीचे वाण' या आत्मचरित्रातून तत्कालीन इतिहासावर कसा प्रकाश पडला आहे वा या आत्मचरित्राच्या माध्यमातून तत्कालीन इतिहासाचे वाचन नव्या संदर्भात कसे करता येते वा आजच्या निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे तत्कालीन ऐतिहासिक संदर्भात कशी शोधता येतात, याचा वेध या लेखातून घेतला गेला आहे.

मोहन रानडे हे गोवा मुक्तिसंग्रामातील एक बिनीचे योद्धे; ज्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग अनुसरून गोवा मुक्तीचे स्वप्न पाहिले व त्याची जबर किंमतही मोजली. त्यांनी साडेआठ वर्षे पोर्तुगालच्या तुरुंगात काढली. त्या अगोदर गोव्यात चार-साडेचार वर्षे म्हणजे साडेतेरा वर्षांपेक्षा जास्त काळ त्यांनी तुरुंगात काढला. अशा एका स्वातंत्र्यवीराचे हे आत्मचरित्र आहे. त्यातही दुःखाची गोष्ट म्हणजे गोवा मुक्त झाल्यानंतर जवळजवळ सात वर्षे त्यांना भारतीय नेत्यांच्या पांगळ्या विदेश धोरणामुळे परदेशी तुरुंगात खितपत पडावे लागले. त्यामुळेच हे आत्मचरित्र म्हणजे एक ऐतिहासिक दस्तऐवज झाले आहे. हे आत्मचरित्र लिहिण्यामागील भूमिकाही ऐतिहासिक स्वरूपाचीच आहे. या आत्मचरित्राच्या मनोगतात लेखकाने ते स्पष्टपणाने सांगितलेही आहे. ते लिहितात, 'गोमंतक मुक्तिसंग्रामात जो अल्पसा भाग घेण्याचे भाग्य मला लाभले, जो अनुभव मला आला, त्याला लिखित रूप देणे

इतिहासाच्या दृष्टीने आवश्यक होते.' (पान ७) त्यामुळे या आत्मचरित्राकडे ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातूनच पाहिले पाहिजे. हे आत्मचरित्र लिहिण्यामागील तीन प्रमुख कारणे सांगता येतात आणि ती तिन्ही कारणे ऐतिहासिक स्वरूपाचीच आहेत. ती कारणे अशी -

१) ज्यांचे गोवा मुक्तिसंग्रामात अनन्यसाधारण योगदान होते परंतु जे प्रसिद्ध झाले नव्हते, अशा सामान्य लोकांच्या असामान्य त्यागाचे दर्शन सर्वांना घडवणे.

२) पोर्तुगीज जनता व साम्राज्यवादी पोर्तुगीज सरकार ही एकरूप नाहीत, भिन्न आहेत, परस्परविरुद्ध आहेत, त्यांच्यात संघर्ष सुरू आहे; त्या संघर्षाचे दर्शन करून देणे.

३) गोवा मुक्तीनंतर कैद्यांच्या अदलाबदलीच्या बाबतीतील निर्लज्ज इतिहासाची पुनरावृत्ती पुन्हा कोणत्याच भारतीयाच्या वाट्याला येऊ नये.

ही तिन्ही कारणे लक्षात घेतल्यास हे आत्मचरित्र लिहिण्यामागील ऐतिहासिक दृष्टीकोन स्पष्टपणे दिसून येतो.

ऐतिहासिक संदर्भात विचार करता गोवा हा पूर्वापार भारताचा अविभाज्य भाग राहिला आहे. त्यामुळेच या विवक्षित प्रदेशावर जरी पोर्तुगीजांची सत्ता असली आणि त्यांनी येथे प्रचंड प्रमाणात धार्मिक व सांस्कृतिक संहार घडवून आणला; तरीसुद्धा ही भूमी सांस्कृतिकदृष्ट्या मूळ भूमीशी कायम जोडून राहिली आणि म्हणूनच गोवा मुक्तीसाठी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांपासून अनेकांनी प्रयत्न केल्याच्या ऐतिहासिक नोंदी सापडतात. याच आपलेपणातून आणि आपल्याच देशाचा एक तुकडा अजूनही गुलामीत अडकून पडला आहे व त्याला मुक्त करणे हे आपले कर्तव्य आहे, या भूमिकेतून अनेकांनी गोवा मुक्तिसंग्रामात हिरिरीने भाग घेतल्याचे दिसते. यामध्ये भारताच्या विविध भागातून आलेले अनेक योद्धे असले तरी महाराष्ट्राशी गोव्याचे सांस्कृतिकदृष्ट्या अधिक जवळचे नाते असल्याने महाराष्ट्रातून गोवा मुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या योद्ध्यांची संख्या अधिक होती.

१९४६मध्ये डॉ. लोहियांनी मडगावला घेतलेल्या सभेनंतर या स्वातंत्र्य चळवळीला नवी उभारी मिळाली आणि १९४७मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर या मोहिमेला अधिक गती मिळाली. या काळातच आपण देशासाठी काहीतरी केले पाहिजे या भूमिकेतून अनेक युवक गोवा मुक्ती चळवळीकडे वळले. मोहन रानडे त्यातीलच एक. त्यांचे मूळ नाव मनोहर आपटे. ते याच नावाने प्रथम गोव्यात आले होते, पण त्यांची पोर्तुगीज सरकारकडे कोणीतरी चहाडी केल्यामुळे त्यांना गोवा

सोडून जावे लागले. पूर्वीची ओळख लपवण्यासाठी ते पुन्हा आले ते मोहन रानडे हे नाव घेऊन; जी त्यांची ओळख कायम राहिली. बालपणापासून त्यांच्यावर राष्ट्रीय वृत्तीचे संस्कार झाल्याचे दिसते. सावरकर हे त्यांचे दैवत होते व देशभक्तीचे स्फुरण त्यांना सावरकरांकडूनच प्राप्त झाले होते. खंडित स्वरूपात का होईना भारत स्वतंत्र झाला, पण गोवा अजून पारतंत्र्यात आहे आणि त्याला स्वतंत्र करायचे असेल तर चळवळीशिवाय पर्याय नाही. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' या काव्यपंक्ती मनात ठेवून ते स्वातंत्र्यलढ्यात उतरल्याचे दिसते. सांगलीत त्यांनी घेतलेली बाबाराव सावरकरांची भेट आणि मुंबईला येऊन घेतलेली स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या होत्या. त्याचप्रमाणे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते ही गोष्टदेखील नमूद केली पाहिजे. ते गोव्यात आले ते शिक्षक म्हणून. या संदर्भात ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या काही गोष्टींची नोंद केली पाहिजे, ज्याचा संदर्भ या आत्मचरित्रात लेखकाने दिला आहे. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे गोव्यातील स्वातंत्र्य चळवळ ही 'जय हिंद'ची चळवळ म्हणून ओळखली जात होती. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याचा केवढा प्रभाव तत्कालीन गोव्यावर होता हे यातून सूचित होते. 'जय हिंद!' या दोन शब्दांत पोर्तुगीज वसाहतवाद्यांनाही आपले मरण दिसले. कारण येथील सर्व चळवळीलाच त्यांनी 'जय हिंद'ची चळवळ असे नाव दिले.' (पान १०) या लेखकाने केलेल्या नोंदीवरून हे अगदी स्पष्टपणे सूचित होते. त्याचबरोबर सुभाषबाबूंना त्यांच्या कार्यात यश आले असते तर आजच्या भारताचा इतिहास किती वेगळा असता हेही लक्षात येते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेथील मराठी शाळा या गोवा मुक्ती लढ्याचे केंद्र होत्या. या संदर्भात लिहिताना त्यांनी लिहिले आहे, 'या आंदोलनाचे गोव्यातील मुख्य व्यासपीठ होते मराठी प्राथमिक शाळा! गोव्यातील समस्त हिंदूंना मराठीतून शिक्षण हवे होते व पोर्तुगीजांना अर्थातच ते नको होते. हे शिक्षण देण्यासाठी गोव्याबाहेरील शिक्षक अधिक पसंत केले जात. या शाळा बेकायदा असत. त्या देवळा-ओसऱ्यांतून चालत. परंतु गोमंतकीय गावकरी पै-पैसा गोळा करून शिक्षकांना वेतन देत.' (पान १०) ही नोंद गोव्यातील मराठी भाषेच्या स्थानाची ऐतिहासिक समीक्षा करणारी आहे. येथील राष्ट्रीय विचारांचे आणि संस्कृतीचे भरणपोषण करण्याचे कार्य मराठीने केले. गोमंतकीय हिंदूंना मराठीबद्दल आपुलकी आहे ती महाराष्ट्रवाल्यांच्या पुळक्यातून नव्हे, तर ती आपल्या सांस्कृतिक अभिसरणाची भाषा आहे म्हणून. ही येथील भाषिक चळवळीच्या इतिहासात नोंद

करण्यासारखी गोष्ट आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या या आत्मचरित्राकडे पाहत असताना लेखकाचा अहिंसक चळवळीकडून सशस्त्र क्रांतिकारक लढ्याकडे झालेला प्रवास हा लक्षात घेण्यासारखा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा प्रभाव असला तरी लेखक इथे आला तो सशस्त्र क्रांतीचे स्वप्न घेऊन नव्हे तर समाज परिवर्तनातून व लोकलढा उभारून गोवा मुक्त करण्याच्या विचारातून. पण महाराष्ट्रातील व देशभरातील काँग्रेस नेत्यांकडून जो भ्रमनिरास त्यांच्या वाट्याला आला त्यातून ते सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. या संदर्भातील या पुस्तकातील एका वक्तव्याचा उल्लेख केला पाहिजे. 'भारत स्वतंत्र होताच चोवीस तासांच्या आत आग्वादवर भारतीय तिरंगा फडकलेला दिसेल, अशी गर्जना करून स. का. पाटील यांनी भरपूर टाळ्याही मिळवल्या होत्या. १९४८ साल उजाडले व संपले. १९४९ उजाडले. परंतु लाल किल्ल्यावर फडकलेला 'तिरंगा प्यारा' आग्वादवर काही फडकला नव्हता.' (पान ९) हळूहळू भारतीय काँग्रेस नेतृत्वाकडून भ्रमनिरास झाल्यामुळे युवक सशस्त्र क्रांतीकडे कसे वळले याचे हे उदाहरण आहे. तत्कालीन गोव्याचे लेखकाने रेखाटलेले चित्र ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

१९४९ साली लेखक मनोहर आपटे या आपल्या खऱ्या नावाने ते गोव्यात आले व धारगळच्या शाळेत शाळामास्तर झाले. त्या काळच्या तरुण मुलांनी या ठिकाणी 'हरिजन सेवा संघ' स्थापन केला होता ही गोष्ट महत्त्वाची! तसेच याची नोंद करताना, 'हरिजन सेवेचे विधायक कार्य करीत असताना येथील दारिद्र्याचे दर्शन मला जवळून घेता आले असते. त्यांच्यावर होणाऱ्या स्वदेशी अन्यायाशीही माझा परिचय झाला असता.' हे लेखकाचे उद्गार तत्कालीन समाजस्थितीची आपणाला कल्पना देतात.

१९५० मध्ये मोहन रानडे बनून ही स्वारी पुन्हा गोव्यात दाखल झाल्यानंतर त्यांनी विविध शाळांमधून शिकवले. ते सत्तरीपासून फोंड्यापर्यंत ज्या विविध भागांत फिरले, त्यातून तत्कालीन गोमंतकाचे जे दर्शन त्यांनी पुस्तकातून घडवले आहे, त्यातून त्या काळची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती स्पष्टपणे आपल्यासमोर उभी राहते. आंबेलीपासून, मोल्यांपासून नावशीपर्यंत त्यांचा सुरू असलेला प्रवास सावईला जाऊन थांबला. येथील शाळांच्या वर्णनांवरून तत्कालीन शैक्षणिक परिस्थितीची आपणाला सहज कल्पना येते. पेज, नाचण्याची आंबील आणि खारातील गरे खाऊन राहणारा तत्कालीन समाज आपल्या दृष्टीस पडतो. या सर्व प्रवासात व त्यासोबत गोवा मुक्तीचे जे आंदोलन चालू होते त्यातील अगदी

प्रत्येकाचा नावासहित उल्लेख लेखकाने केला आहे, ही निश्चितच जाणीवपूर्वक केलेली कृती आहे. स्वातंत्र्य चळवळीत जे नेते असतात ते सर्वांच्या समोर येतात. त्यांचा त्यागही सर्वांना कळतो, पण असे असंख्य लहानमोठे कार्यकर्ते असतात ज्यांचे कार्य मोठे असते पण ते इतिहासाच्या पानांवर कधीच दिसत नाहीत. असे सामान्य स्वातंत्र्यसैनिक दुर्लक्षिले जाऊ नयेत म्हणून त्यांनी त्यांचा नावासहित उल्लेख केल्याचे दिसते. त्यांनी केलेले हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. यातील अनेक जण केवळ या आत्मचरित्रामुळे सर्वांना ज्ञात झाले व इतिहासाच्या पानांवर त्यांची नोंद होऊ शकली. या आत्मचरित्राकडे ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून पाहताना हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा वाटतो.

पोर्तुगीज राज्यकर्ते आणि पोर्तुगीज सामान्य जनता यांच्या विचारांतील ज्या तफावतीचे दर्शन लेखकाने घडवले आहे तेही महत्त्वाचे आहे. १९१०मध्ये पोर्तुगालमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यानंतर गोव्यातील लोकांना काही अधिकार मिळाले होते व त्यामुळे गोव्यात अनेक मराठी शाळा सुरू झाल्या, हिंदूंना धार्मिक विधी करण्याची मोकळीक मिळाली, मतदानाचा अधिकार मिळाला आणि मराठी नियतकालिकेदेखील सुरू झाली. पण हे प्रजासत्ताक १९२६पर्यंतच टिकले व १९२६मध्ये सालाझारची हुकूमशाही राजवट सुरू झाली. पोर्तुगालच्या तुरुंगात असताना सालाझारच्या हुकूमशाही विरोधात आवाज उठवण्याच्या साम्यवादी विचारांच्या अनेक राजकीय कैद्यांशी लेखकाचा संबंध आला. त्यांच्याशी लेखकाचा जो वार्तालाप होई त्यावरून लेखकाने नोंदवलेली निरीक्षणे अशी की, तेथील सामान्य जनतेचा हुकूमशाहीला विरोध होता व ते वसाहतींना स्वातंत्र्य देण्याच्या बाजूने होते. त्यामुळेच लेखकाबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल त्यांना आपुलकी होती. लेखकाची ही निरीक्षणे योग्यच असतील पण पोर्तुगालमध्ये प्रजासत्ताक राज्य सत्तेवर असते तरी त्यांनी गोव्याला सहज स्वातंत्र्य दिले असते असे समजणे सयुक्तिक नाही. कारण १९१० ते १९२६ या काळात त्यांनी गोमंतकीयांना वा त्यांच्या ज्या इतरत्र वसाहती होत्या त्यांना काही गोष्टींचे स्वातंत्र्य दिले असले तरी त्यांचा सार्वभौमत्वाचा अधिकार कुठेच मान्य केला नव्हता. या ठिकाणी आणखी एका गोष्टीची नोंद केली पाहिजे. इंग्लंडमध्ये लोकसत्ताक राष्ट्र असूनही त्यांनी भारतावर एवढी वर्षे राज्य केले. त्यामुळे पोर्तुगालमध्ये प्रजासत्ताक राज्य आले असते तर गोवा मुक्ती लगेच झाली असती हे लेखकाचे मत तेवढेसे सयुक्तिक वाटत नाही. कदाचित तुरुंगातील मर्यादित अनुभवावरून वा त्या कैद्यांशी निर्माण झालेल्या भावनिक नात्यावरून त्यांना तसे वाटत असण्याची शक्यता जास्त आहे.

या आत्मचरित्रातील ऐतिहासिकदृष्ट्या असलेला तिसरा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गोवा मुक्तीनंतर जे गोमंतकीय राजबंदी पोर्तुगालच्या विविध तुरुंगात खितपत पडले होते. त्यांच्या सुटकेसंदर्भात भारत सरकारने कोणतेच प्रयत्न केले नाहीत, या संदर्भातील आहे. या सर्व घटनांतून भारताच्या पांगळ्या विदेश धोरणावर प्रकाश पडला आहे. लेखकाने म्हटल्याप्रमाणे आपली आंतरराष्ट्रीय प्रतिमा जपण्यासाठी पंडित नेहरूंनी हा विषय जोरकसपणे लावून धरला नाही ही भारतीय इतिहासातील लाजिरवाणी गोष्ट म्हटली पाहिजे. या संदर्भातील आपले मत व्यक्त करताना लेखकाने म्हटले आहे, '१९४७ ते १९६१पर्यंत म्हणजे पुरी चौदा वर्षे गोवा मुक्त होण्याच्या दृष्टीने केवळ शाब्दिक निवेदनांखेरीज कसलेही प्रभावी पाऊल भारताने उचलले नव्हते. इतर राष्ट्रे काय म्हणतील याचा विचार करीतच नेहरू राहिले. स्वातंत्र्याची व न्यायाची लवकरात लवकर प्रतिष्ठापना कशी होईल हा विचार त्यांच्या मनाला शिवला नाही.' (पान २३९) ही निश्चितच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासूनचे भारताचे हेच धोरण आहे. गोवा मुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांना साहाय्य करायचे सोडून त्यांच्या मार्गात अडथळे आणण्याचे कामच भारत सरकारने केले होते. लेखकालाही बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी एकदा अटक केली होती, तर अनंत थळी व सुखा शिरोडकर यांना तुरुंगात डांबले होते. हे क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करतात म्हणून भारत सरकार यांच्या विरोधात होते असे म्हणावे तर १९५५ साली गांधीवादी पद्धतीने सत्याग्रह करायला जाणाऱ्या सत्याग्रहींच्या वाटेतही भारत सरकारने अनेक आडकाठ्या निर्माण केल्या होत्या. काँग्रेस वर्किंग कमिटीने १९५५मध्ये पास केलेला एक ठराव तर चमत्कारिक होता. 'भारताच्या एका भागात चाललेल्या परकीयांच्या जुलमी राजवटीविरुद्ध निषेध व्यक्त करण्याचा भारतीयांचा अधिकार काढून घ्यावा' असा हा ठराव होता आणि त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारत सरकारने हा ठराव मान्य केला होता.' (पान ७७) यामुळे गोवा मुक्तीबद्दलचे काँग्रेसचे धोरणच गोंधळात टाकणारे होते. म्हणूनच गोमंतकीय मुक्ती लढ्यात भाग घेणाऱ्यांना मदत करण्याऐवजी त्यांना सतावण्याचे धोरण भारत सरकारने स्वीकारले होते. या संदर्भातील या आत्मचरित्रातील एक नोंद महत्त्वाची आहे. 'वजऱ्यात ठेवलेले जिलेटीन आम्हाला गवताच्या गंजीत लपवून ठेवावे लागले. पोर्तुगीज पोलीस धाडसाने हद्द ओलांडून वजऱ्यात येतील व त्यांच्या हातात हा साठा पडेल या भीतीने नव्हे तर भारत सरकार त्या ठिकाणी जाऊन त्याचा ताबा घेईल व आम्हांस सतावेल यासाठी ही उपाययोजना करावी लागली होती.' (पान ८६) हा

सर्व दारूगोळा भारतीय सीमेत आणून ठेवण्यापेक्षा पोर्तुगीज हद्दीतच ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. याउलट अफ्रिकेतील दाहोमेसारख्या अत्यंत छोट्या पण नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्राने 'सां जुआंव द बातिश्त' ही वसाहत पोर्तुगीजांनी ताबडतोब सोडून द्यावी असा निर्वाणीचा इशारा त्यांना दिला होता. भारताच्या पांगळ्या धोरणासमोर हा बाणेदारपणा जास्त उठून दिसतो.

गोवा मुक्त केल्यानंतर खरेतर राजकीय कैद्यांच्या अदलाबदलीचा विषय त्यानंतरच्या चर्चेच्या केंद्रस्थानी असला पाहिजे होता, पण भारत सरकारने २१ डिसेंबर १९६१मध्ये काढलेल्या पत्रकात स्पष्टपणे म्हटले होते की, 'पोर्तुगीज सरकारची इच्छा असेल तर भारत सरकार मोठ्या आनंदाने गोवा, दीव, दमणमधील सर्व पोर्तुगीज नागरिकांना, कैद केलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना व नागरी लोकांनासुद्धा परत पाठवेल... एकाही पोर्तुगीजाला मोझांबिकमध्ये अथवा अन्यत्र स्थानबद्ध असलेल्या भारतीयांच्या सुटकेसाठी ओलीस म्हणून भारत सरकार ठेवणार नाही.' (पान २२५) म्हणजे गोवा मुक्त करून आपण खूप मोठे पाप केले असून त्याच्या परिमार्जनासाठी भारत सरकार जणू उतावीळ झाले होते. नाराज युरोपिअन राष्ट्रांची नाराजी दूर करणे हेच नेहरूंचे विदेश धोरण होते. मजा म्हणजे भारत सरकारने विनंती करूनही पोर्तुगीज हुकूमशाही राजवटीने आपल्या लोकांना इथून नेण्याची अजिबात घाई न करता मोठा मुत्सद्दीपणा दाखवला. भारताने आपले सर्व पत्ते अगोदरच उघड केले. जे भारतीय कैदेत होते त्या अधिकाऱ्यांवर खटले भरले असते तर पोर्तुगीज सरकारने देशांतर्गत दबाव वाढल्याने सर्व राजकीय बंद्यांना सोडून दिले असते. या संदर्भात काही राजकीय विश्लेषक असा दाखला देतात की, १९४७मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने जर गोवा ताब्यात घेतला असता, तर दुसऱ्या महायुद्धात पोर्तुगाल दोस्त राष्ट्रांकडून लढले असल्यामुळे व त्यांच्यात झालेल्या करारानुसार, दोस्त राष्ट्रातील कोणत्याही देशावर आक्रमण झाल्यास तो दोस्त राष्ट्रावरील हल्ला मानून त्याविरुद्ध दोस्त राष्ट्रांनी एकत्रित आक्रमण करावे असे ठरले होते. भारताने गोवा मुक्त केल्यास ते दोस्त राष्ट्रावरील आक्रमण समजून दोस्त राष्ट्रांनी भारतावर आक्रमण केले असते. पण या दाव्यातही काही तथ्य असल्याचे दिसत नाही.

मुळात गोवा ही पोर्तुगीजांची वसाहत होती हे लक्षात घेतले पाहिजे. पोर्तुगीजांच्या आक्रमणाअगोदर तो भारताचा अविभाज्य भाग होता हे अनेक पुराव्यांनिशी सिद्ध करता आले असते. दादरा, नगरहवेली पोर्तुगीजांची वसाहत असूनही १९५०मध्ये हा भाग मुक्त केल्यानंतर भारताचा निषेध करण्यापलीकडे

पोर्तुगीजांनी आणखी काहीच केले नव्हते व दोस्त राष्ट्रे भारताविरुद्ध युद्ध करण्याच्या स्थितीत नव्हती हेही सत्य आहे. त्यामुळे आपली आंतरराष्ट्रीय शांतिदुताची प्रतिमा जपण्यासाठीच नेहरूंनी गोवा मुक्ती लांबवली हे ऐतिहासिक सत्य म्हणून आपल्यासमोर येते. त्यापेक्षाही दुर्दैवाची गोष्ट म्हणजे गोवा मुक्तीनंतर या राजकीय बंद्यांच्या सुटकेसाठी भारत सरकारने कोणतेही प्रयत्न केले नाहीत. बॅरिस्टर नाथ पै यांनी 'पोर्तुगीज कैद्यांच्या प्रत्यार्पणाच्या बदल्यात भारतीय राजबंद्यांच्या सुटकेचा मुद्दा पोर्तुगालसमोर मांडावा,' असे सुचवले असता नेहरूंनी, 'यह हमारी नीति नहीं है।' असे उत्तर दिले होते. आश्चर्य म्हणजे ज्या पाच व्यापाऱ्यांना गोवा मुक्तीनंतर पोर्तुगीज सरकारने पोर्तुगालमध्ये अटक केली होती त्यांच्या सुटकेसाठी भारत सरकारने सर्व स्तरावर प्रयत्न करून त्यांची सुटका करवून घेतली. म्हणजे व्यापाऱ्यांसाठी तत्पर असलेले भारत सरकार राजबंद्यांबद्दल मात्र पूर्ण उदासीन होते ही गोष्ट हे आत्मचरित्र वाचताना लक्षात आल्यावर होणारी जाणीव मन खिन्न करणारी आहे. नंतरच्या काळात दत्तात्रय देशपांडे वा स्वत: लेखकाची जी सुटका झाली ती अनेकांनी केलेल्या वैचारिक प्रयत्नांमुळे. सुधीर फडके यांनी सुरू केलेल्या 'मोहन रानडे विमोचन समिती' व मेक्सिकन वकिलातीच्या प्रयत्नांतून मोहन रानडेंची सुटका झाली. भारत सरकार शेवटपर्यंत उदासीनच राहिले ही गोष्ट आपणाला निश्चितच शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे.

या आत्मचरित्राचा विचार केला असता एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे असे निश्चित म्हणता येते. गोवा मुक्तिसंग्रामाचा बराच इतिहास या आत्मचरित्रातून समोर येतोच, त्याचबरोबर मुक्तीपूर्व काळातील गोमंतकाच्या सामाजिक जीवनाचा आरसा म्हणूनही त्याकडे पाहता येते. पोर्तुगालमध्ये त्या काळी चालू असलेल्या सालाझार हुकूमशाही विरोधातील आंदोलनाच्या अभ्यासाचे साधन म्हणूनही या आत्मचरित्राचा अभ्यास करता येतो. त्याचप्रमाणे तत्कालीन भारत सरकारच्या विदेश नीतीचा अभ्यास करण्याचे साधन म्हणूनही याकडे पाहता येते. या सर्व कारणांमुळेच या आत्मचरित्राला ऐतिहासिक दस्तऐवजाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) सतीचे वाण - मोहन रानडे, सिंधू प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १८ डिसेंबर १९६९

■